पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०४/२०१७** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पहिली सभा (विशेष सभा) शनिवार दिनांक **१५/०४/२०१७** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्री.सुनिल पाटील, (भा.प्र.से.)** संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.फुगे भिमाबाई पोपट
४. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ
५. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
६. मा.अॅड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लावंड – कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा – संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या विशेष सभेत मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.**

**(मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली)**

**मा.नगरसचिव -** मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदाकरीता मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपुर्त करण्यात येत आहे.

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा - संचालक, संचालनालय, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | मा.गावडे राजेंद्र तानाजी | मा.फुगे भिमाबाई पोपट |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

( उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेसाठी विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

ठराव क्रमांक - १ विषय क्रमांक – १

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**---------**

**सही/-**

**( सुनिल पाटील )**

पिठासीन प्राधिकारी तथा
संचालक, संचालनालय,
भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा
क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
(विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

----------

(नवनिर्वाचित सभापती **मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले. )

**मा.नगरसचिव** - विषय क्र.२ - मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती उपसभापतीची नेमणूक करणे.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.सभापती यांचेकडे सुपुर्द करणेत येत आहे.

**मा.सभापती** - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपसभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाकरीता एकच नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | **मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ** | **मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत** | **मा.गावडे राजेंद्र तानाजी** |

( या नंतर या नामनिर्देशन पत्रांवर उपस्थित सदस्यांना काही आक्षेप असल्यास त्यासाठी वेळ देण्यात आला.)

मा.उपसभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून ते नामनिर्देशनपत्र वैध ठरले आहे. त्यामध्ये मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

( उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा.सभापती यांजकडे देऊन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल अशी कायद्यात तरतूद आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी देणेसाठी विचारणा केली असता उपस्थित सन्मा.सदस्यांनी एकच नामनिर्देशन पत्र असल्याने उमेदवारी मागे घेण्यासाठी कालावधी न देता पुढील कार्यवाही करणेबाबत सुचविले.)

मा.उपसभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे उपसभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

---------

ठराव क्रमांक - २ विषय क्रमांक - २

दिनांक - १५/०४/२०१७ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती उपसभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या एक नामनिर्देशन पत्रामधील मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती उपसभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने

**मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे उपसभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

---------

ठराव क्रमांक - ०३ विषय क्रमांक - ०३
दिनांक - १५/०४/२०१७
सुचक : मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या शुक्रवारी दुपारी ३.०० वा. विशेष समिती सभागृहात भरविण्यात यावी. तथापी सदर दिवशी कार्यालयास सुट्टी/सुट्टया असलेस त्या सुट्टी/सुट्टयांनंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३.०० वा. सभा भरविण्यात यावी. तसेच कोणीही सन्मा.सदस्य उपस्थित नसल्याने होऊ न शकणारी सभा मा.सभापती निश्चित करतील त्या दिवशी व त्या वेळी भरविण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते)**
**सभापती**
क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३०/२०१७
दिनांक : १५/०४/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.